# ओर्लँडोतील 'चिन्मया मिशन'

फार पूर्वीची गोष्ट आहे. डॉ. श्याम नाडकर्णी ह्यांच्या कार्यालयात दर रविवारी सकाळी नऊ वाजता ज्ञानेश्वरीचे वाचन व निरूपण होत असे. त्या नंतर थोड्या वर्षानी डॉ. श्याम व डॉ. शैलजा नाडकर्णी ह्यांनी चिन्मया मिशनची स्थापना केली. हे दोघेही पेशाने डॉक्टर, त्यात शैला तर नवजात बाळांची हृदयतज्ञ, म्हणजे नेहमी जीवन-मरणाची समस्या हाताळणारी. पण ह्या जोडप्याने त्यांच्या अखंडित मार्गदर्शनाने ओर्लँडोला चिन्मया मिशन ही मोठी देणगी दिलेली आहे.

चिन्मया मिशनमधे बालविहार वर्ग चालू केला. प्रौढांसाठी गीता, उपनिषद वाचन , निरूपण, चर्चा आणि अनेक धार्मिक आणि बौध्दिक विषय तिथे शिकवले जातात. सुरवातीला हे वर्ग लहान प्रमाणात होते. पण जसजशी ओर्लँडोतील भारतीय लोकसंख्या वाढायला लागली तशी ही जागा कमी पडू लागली. तेंव्हा कॅसलबरी ह्या ओर्लँडोच्या उपगरात पाच एकर जागा खरेदी केली तिथे एक घर होते. त्याचे चिन्मया मिशन असे रुपांतर केले व स्वामी चिन्मयानंदांच्या हस्ते ह्या भूमीला "तपोवन" असे नांव दिले. काही वर्षानी हे घरही लहान पडायला लागले कारण बाल विहारच्या मुलांची संख्या दिडशेच्या वर गेलेली होती. मग तिथे मोठा हॉल, दोन तीन खोल्या बांधण्यात आल्या. ह्या वास्तूला "कैवल्य" हे नाव दिले गेले व तिथे शिवाच्या अतीसुंदर शुभ्र संगमरवरी मूर्तीची स्थापना झाली.

सध्या सुमारे अडिचशे विद्यार्थी, (चार ते अठरा वर्षे ह्या वयोगटातील) दर रविवारी सकाळी आठ वाजल्यापासून दुपारचे बारा वाजेपर्यंत धार्मिक शिक्षण तर घेत असतातच पण तिथे हिंदी, मराठी, गुजराती, तेलगु भाषेचे वर्ग चालू आहेत. हे शिकवण्यासाठी अनेक भारतीय प्रौढ जातीने तिथे हजर असतात. शास्त्रीय संगीत, तबला, हार्मोनियम हे शिकवायला आपले पंडित नंदकिशोर मुळ्ये तेथे हजर असतात.

आपल्या भारतीय सणाचे महत्त्व मुलांना शिकवून त्या सणाची मजाही मुले लुटतात. उदाहरण म्हणजे होळीला रंग उधळण, राम नवमीला रामजन्म, गोकुळाष्टमीला गोपाळकाला, दिवाळीला पणत्या तयार करुन रोषणाई करायची असे सर्व केल्याने मुलांचे व त्याच्या आई वडिलांचे चिन्मया मिशनशी अतूट नाते जमले आहे. दर वर्षी मुलांची परिक्षा घेतली जाऊन मग त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळतो. येथून शिकून काही मुले आता कॉलेज ग्रॅज्युएट झाली आहेत पण ही मुले जेंव्हा परत ओर्लँडोला येतात तेंव्हा चिन्मया मिशनला आणि शैलजा नाडकर्णींना भेटल्या खेरीज रहात नाहीत.

रविवारी सकाळी उशीरापर्यंत झोपायचे, अंथरुणात लोळायचे असा एक अलिखित नियम असतो. पण बालविहारला जमणारी मुले मात्र रविवारी सकाळी आईवडिलांच्या मागे लागून चिन्मया मिशनला येतात हेच आमच्या ह्या संस्थेचे मोठे यश आहे.

इथे शिकणाऱ्या मुलांना त्यांच्या नेहेमीच्या शाळेत आपण भारतीय, हिन्दू आहोत असं सांगण्यात अभिमान वाटतो. इतकेच नाही तर बरीच मुले त्यांच्या शाळेत आपल्या धर्माची, देवांची माहिती इतरांना अभिमानाने देतात.

तीन वर्षांपूर्वी डॉक्टर श्याम नाडकर्णी स्वर्गवासी झाले. पण शैलजाने तिचा स्वत:चा व्यवसाय सांभाळून स्वत:ला पूर्णपणे चिन्मया मिशनला वाहून घेतले आहे. श्याम व शैलजा नाडकर्णी म्हणजेच चिन्मया मिशन असे आम्ही ओर्लँडोवासी सहज म्हणून जातो.

**सौ. नलिनी आढाव** (ओर्लँडो, फ्लोरिडा)